# शिरूर नगरपरिषद, घोडनदी

पुणे- नगर रोड, ता.शिरुर, जि.पुणे- ४१२२१०

Tel No. ०२१३८-२९९१२२ Email Id: shirur.pune@gmail.com
Tel No. ०२१३८-२९९२६२ Website: shirurnagarparishad.org

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.:- २९३०/२०२१

दिनांक : २३/११/२०२१.

**प्रति,**

**मा. उप वनसंरक्षक ,**
**जुन्नर उपविभाग ,ता. जुन्नर, जि.पुणे- 410502.**

**विषय-** मौजे शिरुर येथील स.नं.1140 वन विभागाच्या जागेतुन जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत पिण्याच्या पाणीपुरवठ्याची पाईपलाईन करणे व अनुषंगिक कामासाठी मान्यता मिळणे बाबत.

**संदर्भ** :- Proposal No. : FP/MH/IRRIG/149069/2021

**महोदय,**

शिरूर नगरपरिषदेचे जलशुध्दीकरण केंद्र व पाण्याच्या टाक्या मौजे गांव शिरूर येथील स.नं.1140 मध्ये आहे. या ठिकाणावरून संपूर्ण शहरास पाणी पुरवठा करणेत येतो, याशिवाय शिरूर शहरास पाणी पुरवठ्याचा कोणताही पर्यायी स्त्रोत उपलब्ध नाही. जलशुध्दीकारण केंद्र व पाण्याच्या टाक्या असलेल्या क्षेत्राच्या संपूर्ण बाजूने स.नं.1140 मधील वन विभागाचे क्षेत्र आहे. शिरूर नगरपरिषदेस जलशुध्दीकरण केंद्रा पासून लाटेआळी रहिवास भागास पाणीपुरवठा करणेसाठी 450 मि. मी. व्यासाची पाईपलाईन करणे व या योजनेच्या स्त्रोतपासून असलेली रायझिंग मेन पाईप लाईन खराब झाल्याने हत्तीडोह पंपीग स्टेशन पासून जलशुध्दीकरण केंद्रापर्यन्त 500 मि. मी. व्यासाची पाईप लाईन करणे व घोड धरण ते जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत 500 मि. मी. व्यासाची पाईप लाईन करणेसाठी 0.27 हेक्टर वन विभागाचे क्षेत्र मिळणेसाठी Proposal No. : FP/MH/IRRIG/149069/2021 प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

मौजे गांव शिरूर येथील स.नं.1140 मधील शिरूर नगरपरिषदेचे जलशुध्दीकरण केंद्र व पाण्याच्या टाक्याच्या बाजूने असलेल्या मौजे गांव शिरूर येथील स.नं.1140 मधील वन विभागाच्या जागेतून या तिन्ही योजनेच्या पाईप लाईन करणे, मेन्टन्नस व दैनंदिन रहदारीसाठी 9 मीटर रुंदीची 300 मीटर लांबीची एकूण 2700 चौ.मी. (0.27 हेक्टर) जागा आवश्यक आहे. यासाठी वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत विहीत नमुन्यात 7 प्रतीत प्रस्ताव सादर करणेत येत आहे. प्रस्तावास मान्यता होणेस नम्र विनंती.

**सोबत-** प्रस्तावाच्या 7 प्रती.

आपला विश्वासू

(ॲड. प्रसाद दिलीप बोरकर)
मुख्याधिकारी
शिरूर नगरपरिषद घोडनदी, जि.पुणे.

शिरूर नगरपरिषद (घोडनदी) स्थापना : १८६८ ता. शिरूर, जि. पुणे

24/11/2021

आवक // जावक. लिपिक
उप वनसंरक्षक कार्यालय
घोड प्रकल्प वनविभाग
तहसिल कार्यालयाजवळ
जुन्नर, जि. पुणे.४१०५०२

Scanned by TapScanner